Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स..नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/१२५८
पुणे ४११ ००४.
दिनांक – २१ मार्च २०२४

प्रति,
विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी Online द्वारे माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ –
१. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क.र.४७/एसडी-५, दि.०३/०२/२०२०
५. शा.नि.क्र.एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.१८/१०/१९९३
६. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/११३१, पुणे ४ दि.१३/३/२०२४
७. अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ, महाराष्ट्र यांचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भीय क्र.१व २ च्या शासन निर्णयानुसार, टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी अनुक्रमे `http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंकवर दि.२० मार्च, २०२४ पर्यंत माहिती सादर करण्याची मुदत देण्यात आली होती.

विविध शिक्षक संघटनांनी केलेल्या मागनीनुसार विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त होण्यास विलंब होत असल्याने , सदर माहिती सादर करण्यासाठी दि.२६ मार्च, २०२४ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

मुदतवाढीच्या अनुषंगाने आपल्या विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना दि. २६ मार्च , २०२४ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने माहिती भरणेबाबत अंतिम मुदतवाढ देण्यात येत असल्याचे सूचित करण्यात यावे. तसेच आपण वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये माहिती राज्यमंडळाकडे सादर करणेबाबत संबंधितांचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे .

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

क्र. कोविमं/लेखा/परीक्षा शुल्क परतावा/3851
दिनांक : 21 / 03 / 2024

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ट महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ट महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक / प्राचार्यांना कळविण्यात येते की, दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी ONLINE माहिती सादर करणेसाठी **दि 26 मार्च, 2024 पर्यंत अंतिम मुदतवाढ** देण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

( सुभाष रा. चौगुले )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर